सकाळ मुंबई, सोमवार, १४ ऑक्टोबर २०२४

सिडकोच्या लॉटरीला भरघोस प्रतिसाद

चोवीस तासांत तब्बल १२,४०० ऑनलाइन अर्ज दाखल

नवी मुंबई, ता. १३ : सिडकोची बहुप्रतीक्षित योजना 'माझे पसंतीचे सिडकोचे घर' या योजनेला नागरिकांचा भरघोस प्रतिसाद मिळत आहे. १२ ऑक्टोबरला सकाळी वाजता सुरू झालेल्या या योजनेच्या पहिल्या २४ तासांतच तब्बल १२,४०० ऑनलाइन अर्ज प्राप्त झाले आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शुक्रवारी (ता. ११) सिडको प्रदर्शन केंद्रात आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक व अल्प उत्पन्न गटासाठीच्या या योजनेचे उद्घाटन केले.

नवी मुंबईच्या विविध नोड्समध्ये ही ६७,००० घरांची महायोजना साकारली जात असून, या गृहनिर्माण योजनेतील पहिल्या टप्प्यांतील २६,००० घरे ग्राहकांना उपलब्ध करण्यात आली आहेत. या योजनेतील प्रकल्पांचा विकास सिडकोच्या परिवहनकेंद्रित विकास, ट्रान्झिट ओरिएन्टेड डेव्हलपमेंट या संकल्पनेवर केंद्रित असून या योजनेत साकारली जाणारी सर्व घरे ही संबंधित नोड्समधील रेल्वे स्थानके, बस स्थानके व मेट्रो स्थानकांच्या जवळच बांधण्यात आली आहेत. याशिवाय अतिशय अत्याधुनिक बांधकाम तंत्राचा वापर करून विकसित केलेल्या या योजनेतील गृहसंकुले सर्व प्रकारच्या पायाभूत व सामाजिक सोयी-सुविधांनी युक्त आहेत.

सोडतीची वैशिष्ट्ये

अर्जदारांना या सोडतीसाठी ११ नोव्हेंबर २०२४ पर्यंत ऑनलाइन नोंदणी करता येणार आहे. ही योजना आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक व अल्प उत्पन्न गटांसाठी असून प्रधानमंत्री आवास योजनेच्या अनुदानाचा लाभही घेता येईल. या सोडतीशी संबंधित सर्व प्रकारच्या अर्जप्रक्रिया या सोप्या सुलभ ऑनलाइन पद्धतीने होणार असल्याची माहिती सिडको प्रशासनाने दिली.

लोकमत मुंबई, सोमवार, दि. १४ ऑक्टोबर २०२४

सिडकोच्या घरांसाठी १२ हजार अर्ज

लोकमत न्यूज नेटवर्क

नवी मुंबई : सिडकोच्या २६ हजार घरांची योजना जाहीर झाली आहे. दसऱ्याच्या पूर्वसंध्येला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते या योजनेचा शुभारंभ झाल्यानंतर १२ ऑक्टोबरपासून 'माझे पसंतीचे घर' या योजनेंतर्गत ऑनलाइन अर्ज नोंदणीला सुरुवात झाली. गेल्या २४ तासांत १२ हजार ४०० ग्राहकांनी घरासाठी ऑनलाइन अर्ज नोंदणी केली आहे. त्यामुळे पुढील दिवसांत या योजनेतील घरांसाठी विक्रमी प्रतिसाद असेल, असा विश्वास सिडकोच्या संबंधित विभागाने व्यक्त केला आहे.

सिडकोच्या माध्यमातून नवी मुंबईच्या विविध नोड्समध्ये ६७ हजार घरे निर्माण केली जात आहेत. यात पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी १३ हजार, तर अल्प उत्पन्न गटासाठी १३ हजार घरांचा समावेश आहे. माझे पसंतीचे सिडकोचे घर या योजनेंतर्गत ११ नोव्हेंबरपर्यंत ऑनलाइन नोंदणी करता येणार आहे. आर्थिकदृष्ट्या घटकांसाठी उत्पन्न मर्यादा वार्षिक ६ लाखांपर्यंत, तर अल्प उत्पन्न गटासाठी उत्पन्न मर्यादा ६ लाखांपेक्षा जास्त असणे बंधनकारक आहे.

CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

आपलं महानगर सोमवार १४ ऑक्टोबर २०२४

सिडकोच्या लॉटरीला उत्स्फूर्त प्रतिसाद

अवघ्या २४ तासात १२,४०० ऑनलाईन अर्ज

प्रतिनिधी । आपलं महानगर वृत्तसेवा

✦ **नवी मुंबई ।** सिडकोची बहुप्रतिक्षित 'माझे पसंतीचे सिडकोचे घर' या महागृहनिर्माण योजनेला अर्जदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. शनिवार १२ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता सुरू झालेल्या या योजनेच्या पहिल्या २४ तासातच सिडकोला १२,४०० ऑनलाईन अर्ज प्राप्त झाले आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ११ ऑक्टोबर रोजी वाशी, नवी मुंबई येथील सिडको प्रदर्शन केंद्रात आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (ईडब्ल्यूएस) व अल्प उत्पन्न गटासाठीच्या (एलआयजी) योजनेचे उद्घाटन केले होते.

नवी मुंबईच्या विविध नोड्समध्ये ६७ हजार घरांची महायोजना साकारली जात असून या गृहनिर्माण योजनेतील पहिल्या टप्प्यातील २६ हजार घरे ग्राहकांना उपलब्ध करण्यात आली आहेत. या योजनेतील प्रकल्पांचा विकास सिडकोच्या परिवहनकेंद्रित विकास तथा ट्रान्झिट ओरिएन्टेड डेव्हलपमेंट या संकल्पनेवर केंद्रित असून या योजनेत साकारली जाणारी सर्व घरे ही संबंधित नोड्समधील रेल्वे स्थानके, बस स्थानके व मेट्रो स्थानकांच्या जवळच बांधण्यात आली आहेत. याशिवाय अतिशय अत्याधुनिक बांधकाम तंत्राचा वापर करून विकसित केलेल्या या योजनतील गृहसंकुले सर्व प्रकारच्या पायाभूत व सामाजिक सोयीसुविधांनी युक्त आहेत.

या सोडतीची वैशिष्ट्ये

- **अर्जदारांना या सोडतीसाठी ११ नोव्हेंबर २०२४ पर्यंत ऑनलाईन नोंदणी करता येईल.**
- **आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक व अल्प उत्पन्न गटांसाठी घरे**
- **पंतप्रधान आवास योजनेच्या अनुदानाचा लाभही अर्जदारांना घेता येईल.**
- **सिडकोच्या https://.cidcohomes.com या संकेतस्थळावर अर्ज करता येईल.**

नवराष्ट्र | मुंबई, १४ ऑक्टोबर २०२४

सिडकोच्या महागृहनिर्माण योजनेला उत्स्फूर्त प्रतिसाद

नवी मुंबई, (वा.) सिडकोची बहुप्रतीक्षित योजना 'माझे पसंतीचे सिडकोचे घर' या योजनेला नागरिकांचा भरघोस प्रतिसाद मिळत आहे. १२ ऑक्टोबर रोजी सकाळी ११.०० वाजता सुरू झालेल्या या योजनेच्या पहिल्या २४ तासांतच तब्बल १२,४०० ऑनलाईन अर्ज प्राप्त झाले आहेत. गृहनिर्माणाच्या क्षेत्रात सिडको महामंडळावर जनतेचा असलेला अतूट विश्वास या योजने द्वारे पुन्हा एकदा सिद्ध झाल्याचे दिसत आहे. मुख्यमंत्री, एकनाथ शिंदे यांनी ११ ऑक्टोबर २०२४ रोजी वाशी, नवी मुंबई येथील सिडको प्रदर्शन केंद्रात आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक व अल्प उत्पन्न गटासाठीच्या या या योजनेचे उद्घाटन करण्यात आले. योजनेचे संकेत स्थळ https:\\.cidcohomes.com असून नागरिक या योजनेस उत्तम प्रतिसाद देत आहेत. नवी मुंबईच्या विविध नो मध्ये ही ६७ हजार घरांची महायोजना साकारली जात असून, या गृहनिर्माण योजनेतील पहिल्या टप्प्यांतील २६ हजार घरे ग्राहकांना उपलब्ध करण्यात आली आहेत. अत्याधुनिक बांधकाम तंत्राचा वापर करून विकसित केलेल्या या योजनेतील गृहसंकुले सर्व प्रकारच्या पायाभूत व सामाजिक सोयी-सुविधांनी युक्त आहेत.

सोडतीची वैशिष्ट्ये

अर्जदारांना या सोडतीसाठी ११ नोव्हेंबर २०२४ पर्यंत ऑनलाईन नोंदणी करता येणार आहे. ही योजना आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक व अल्प उत्पन्न गटांसाठी असून, प्रधान मंत्री आवास योजनेच्या अनुदानाचा लाभही घेता येईल. या सोडतीशी संबंधित सर्वप्रकारच्या अर्जप्रक्रिया या सोप्या सुलभ ऑनलाईन पद्धतीने होणार आहेत. योजनेविषयी सर्वप्रकारची माहिती सिडकोच्या https:\\.cidcohomes.com या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. अर्जदारांना याजनेशी संबंधित सर्वप्रकारची माहितीसाठी सिडकोच्या वरील संकेतस्थळावरील योजना पुस्तिकेत मिळणार आहे.

हमारा महानगर सोमवार 14 अक्टूबर 2024

सिडको की महागृहनिर्माण योजना में 24 घंटों में 12,400 ऑनलाइन आवेदन प्राप्त

11 नवंबर तक ऑनलाइन आवेदन की अंतिम तिथि

महानगर संवाददाता

नवी मुंबई

सिडको की बहुप्रतीक्षित योजना 'माझे पसंतीचे सिडकोचे घर' को नागरिकों से जबरदस्त समर्थन मिल रहा है। 12 अक्टूबर को सुबह 11 बजे शुरू हुई इस योजना के पहले 24 घंटों में ही 12,400 ऑनलाइन आवेदन प्राप्त हुए हैं। यह योजना सिडको के प्रति जनता के विश्वास को फिर से प्रमाणित करती है। महाराष्ट्र के मुख्यमंत्री एकनाथ शिंदे ने 11 अक्टूबर को वाशी, नवी मुंबई में सिडको प्रदर्शनी केंद्र में आर्थिक रूप से कमजोर वर्ग (EWS) और निम्न आय वर्ग (LIG) के लिए इस योजना का उद्घाटन किया था। नागरिक इस योजना का ऑनलाइन माध्यम से भरपूर लाभ उठा रहे हैं। योजना के तहत 11 नवंबर तक ऑनलाइन आवेदन किया जा सकता है।

नवी मुंबई के विभिन्न नोड्स में 67,000 घरों की यह महायोजना बनाई जा रही है, जिसमें पहले चरण में 26,000 घर उपलब्ध कराए गए हैं। इस योजना के सभी प्रोजेक्ट परिवहन केंद्रित विकास (ट्रांजिट ओरिएंटेड डेवलपमेंट) पर आधारित हैं, और सभी घर रेलवे स्टेशन, बस स्टेशन और मेट्रो स्टेशन के नजदीक बनाए जा रहे हैं। इसके अलावा, इस योजना में अत्याधुनिक निर्माण तकनीक का उपयोग किया जा रहा है और सभी सुविधाएं उपलब्ध कराई जा रही हैं।

योजना की मुख्य विशेषताएं:

- 11 नवंबर 2024 तक ऑनलाइन आवेदन किया जा सकता है।
- यह योजना EWS और LIG वर्ग के लिए है, जिसमें प्रधानमंत्री आवास योजना के तहत सब्सिडी का लाभ भी उठाया जा सकता है।
- आवेदन प्रक्रिया पूरी तरह से ऑनलाइन होगी।
- योजना की पूरी जानकारी सिडको की वेबसाइट https://cidcohomes.com पर उपलब्ध है। योजना पुस्तिका वेबसाइट पर उपलब्ध है,जिससे आवेदक सभी जानकारी प्राप्त कर सकते हैं।

नवभारत टाइम्स । मुंबई। सोमवार, 14 अक्टूबर 2024

सिडको की गृहनिर्माण योजना को प्रतिसाद

■ **निसं, नवी मुंबई:** सिडको की बहुप्रतीक्षित योजना 'मेरा पसंदीदा सिडको का घर' को लोगों से जबरदस्त प्रतिसाद मिल रहा है। 12 अक्टूबर को सुबह 11 बजे शुरू हुई इस योजना के पहले 24 घंटे में ही 12,400 ऑनलाइन आवेदन प्राप्त हुए हैं।

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे ने 11 अक्टूबर 2024 को वाशी, नवी मुंबई में सिडको प्रदर्शनी केंद्र में आर्थिक रूप से कमजोर वर्ग (ईडब्ल्यूएस) और निम्न आय वर्ग (एलआईजी) के लिए इस योजना का उद्घाटन किया था। लोग इस योजना का ऑनलाइन माध्यम से भरपूर लाभ उठा रहे हैं। योजना के तहत 11 नवंबर तक ऑनलाइन आवेदन किया जा सकते हैं। नवी मुंबई के विभिन्न नोड्स में 67,000 घरों की यह महायोजना बनाई जा रही है, जिसमें पहले चरण में 26,000 घर उपलब्ध कराए गए हैं। इस योजना के सभी प्रोजेक्ट परिवहन केंद्रित विकास (ट्रांजिट ओरिएंटेड डिवेलपमेंट) पर आधारित हैं और सभी घर रेलवे स्टेशन, बस स्टेशन और मेट्रो स्टेशन के नजदीक बनाए जा रहे हैं। इसके अलावा, इस योजना में अत्याधुनिक निर्माण तकनीक का उपयोग किया जा रहा है और सभी सुविधाएं उपलब्ध कराई जा रही हैं। यह योजना ईडब्ल्यूएस और एलआईजी वर्ग के लिए है, जिसमें प्रधानमंत्री आवास योजना के तहत सब्सिडी का लाभ भी उठाया जा सकता है। आवेदन प्रक्रिया पूरी तरह से ऑनलाइन होगी। योजना की पूरी जानकारी सिडको की वेबसाइट https://booking.cidcohomes.com/ पर उपलब्ध है।

> 24 घंटे में 12,400 ऑनलाइन आवेदन प्राप्त

नवभारत मुंबई, सोमवार 14 अक्टूबर 2024

24 घंटों में मिले 12,400 आवेदन, ऑनलाइन आवेदन की अंतिम तिथि 11 नवंबर

सिडको की आवास योजना बनी लोगों की पसंद

26 हजार घर बेचने के लिए उपलब्ध

■ **नवी मुंबई,** (सं). सिडको की बहुप्रतीक्षित योजना 'मेरा पसंदीदा सिडको घर' को नागरिकों द्वारा पसंद किया जा रहा है. 11 अक्टूबर को सुबह 11 बजे शुरू हुई इस योजना के पहले 24 घंटों के भीतर 12,400 ऑनलाइन आवेदन प्राप्त हुए हैं. पता हो कि आवास निर्माण के क्षेत्र में सिडको पर जनता का अटूट विश्वास इस योजना से एक बार फिर सिद्ध होता दिख रहा है. महाराष्ट्र मुख्यमंत्री एकनाथ शिंदे तथा उप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ने आर्थिक रूप से कमजोर वर्ग (ईडब्ल्यूएस) और निम्न आय समूह (एलआईजी) के लिए इस योजना का उद्घाटन 11 अक्टूबर को नवी मुंबई के वाशी में सिडको प्रदर्शनी केंद्र में किया था. इस योजना को लोग पसंद कर रहे हैं.

67000 घरों का यह मास्टर प्लान नवी मुंबई के विभिन्न नो में लागू किया जा रहा है और इस आवास योजना के पहले चरण में 26000 घर ग्राहकों को उपलब्ध कराए गए हैं. इस योजना में परियोजनाओं का विकास सिडको के परिवहन-केंद्रित विकास और पारगमन उन्मुख विकास की अवधारणा पर केंद्रित है और इस योजना के तहत सभी घर संबंधित नो में रेलवे स्टेशनों, बस स्टेशनों और मेट्रो स्टेशनों के पास बनाए गए हैं. इसके अलावा, इस योजना में बहुत ही उन्नत निर्माण तकनीकों का उपयोग करके विकसित किए गए आवासीय परिसर सभी प्रकार की बुनियादी सुविधाएं और सामाजिक सुविधाओं का खास ध्यान रखा गया है. आवेदक इस ड्रा के लिए 11 नवंबर 2024 तक ऑनलाइन

पंजीकरण कर सकते हैं. यह योजना आर्थिक रूप से कमजोर वर्ग और निम्न आय वर्ग के लिए है और प्रधानमंत्री आवास योजना की सब्सिडी का लाभ उठा सकते हैं.

प्रहार | मुंबई | रविवार, १३ ऑक्टोबर २०२४

सुखोईचे टेक ऑफ, यशस्वी लँडिंग

नवी मुंबई विमानतळ धावपट्टीची चाचणी यशस्वी

◆ पनवेल (प्रतिनिधी) :

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या धावपट्टीची आज यशस्वी चाचणी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत पार पडली. वायुदलाचे सी-२९५ या विमान धावपट्टीवर यशस्वीपणे उतरविण्यात आले. या विमानांना वॉटर कॅनानद्वारे अनोखी सलामी देण्यात आली. याबरोबरच लढाऊ सुखोई ३० विमानानेही यशस्वी टेक ऑफ केले.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे काम आता जवळपास अंतिम टप्प्यात आहे. त्यासाठी विमानतळाच्या धावपट्टीची आज चाचणी करण्यात आली. या चाचणीनंतर सुखोई ३० या लढाऊ विमानानेही फ्लायपास केला. लँडिंग करणाऱ्या सी २९५ विमानाच्या वैमानिकाचा मुख्यमंत्री शिंदे आणि उपमुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी केंद्रिय नागरी उड्डाण राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, सिडको महामंडळाचे अध्यक्ष संजय शिरसाट, खा. श्रीरंग बारणे, खा. सुनील तटकरे, खा. डॉ. श्रीकांत शिंदे, खा.

नरेश म्हस्के, आ. गणेश नाईक, आ. प्रशांत ठाकूर, आ. महेश बालदी, अपर मुख्य सचिव गृह इक्बाल चहल, सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, विजय सिंघल, नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे, विभागीय आयुक्त डॉ. देशमुख, रायगड जिल्हाधिकारी किशन जावळे यांसह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. सी २९५ विमान हे गांधीनगरहून, तर सुखोई हे पुण्यातून आले होते.

यावेळी माध्यमाशी बोलताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आजचा दिवस इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिला जाईल असे नमूद करून या यशस्वी चाचणीचे महत्त्व अधोरेखित केले. विमानतळाच्या दृष्टीने महत्त्वाचा टप्पा पूर्ण झाला आहे. विजयादशमीच्या एक दिवस आधी झालेल्या या कार्यक्रमामुळे सर्वसामान्य नागरिक आणि प्रवाशांसाठी मोठा आनंद आहे.

सकाळ मुंबई, रविवार, १३ ऑक्टोबर २०२४

नवी मुंबईत होणार गृहस्वप्नपूर्ती

सिडकोच्या २६ हजार घरांसाठी नोंदणी प्रक्रियेस सुरुवात

वाशी, ता. १२ : सिडको महामंडळाच्यावतीने शुक्रवारी (ता. ११ दसऱ्याचे औचित्य साधत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते सिडको महागृहनिर्माण योजनेतील २६ हजार घरांसाठीच्या लॉटरीची सुरुवात करण्यात आली.

प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या धर्तीवर ही लॉटरी काढण्यात आली असून शनिवार (ता. १२) पासून ऑनलाइन अर्ज भरण्यास उपलब्ध झाले आहे. महानगरांमध्ये घरांच्या किमती सातत्याने वाढत आहेत. यामुळे घर खरेदीचे स्वप्न पाहणारे हजारो नागरिक सिडकोकडून उपलब्ध होणाऱ्या घरांची आतुरतेने वाट पाहत असतात. या लॉटरीमध्ये बामनडोंगरी, खारकोपर २ अ, खारकोपर २ ब, खारघर बस डेपो, खारघर बस टर्मिनल, खांदेश्वर रेल्वे स्टेशन, मानसरोवर रेल्वे स्थानक, पनवेल बस टर्मिनल, कळंबोली बस डेपो, तळोजा सेक्टर २८, तळोजा सेक्टर २९, तळोजा सेक्टर ३७ या ठिकाणी घरे उपलब्ध आहे.

२६ हजार सदनिका या प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल व अल्प उत्पनांतील नागरिकांसाठी घरे उपलब्ध करून देण्यात आली आहे. इच्छुक अर्जदारांना एक महिन्यांमध्ये नोंदणी करावयाची आहे. तर घरांच्या किंमती या सिडकोकडून अद्याप जाहीर करण्यात आल्या नसून त्यांच्या किंमती या अन्य प्रकल्पांच्या तुलनेत कमी असतील असा दावा सिडकोकडून करण्यात आला आहे. तर आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांतील घराचा आकार हा वन बीएचके असून ३२२ चौ.फूट आहे. तर अल्प उत्पन्न गटांतील घरांचा आकार हा ३९८ चौरस फूट इतका आहे.

किती घरांची उपलब्धता?

बामण डोंगरी उलवे १७०० सदनिका, खारकोपर २ अ येथे २८८ सदनिका, खारकोपर २ ब २८८, खारघर बस डेपो १७००, खारघर बस टर्मिनल ३४०, खांदेश्वर रेल्वे स्टेशन १२३०, मानसरोवर रेल्वे स्थानक ८४०, पनवेल बस टर्मिनल १७२, कळंबोली बस डेपो १३६०, तळोजा सेक्टर २८ मध्ये २ हजार १८५, तळोजा सेक्टर २९ मध्ये १ हजार २४८, तळोजा सेक्टर २९ मध्ये ४ हजार ४३६, तळोजा सेक्टर २९ मध्ये २ हजार १४२, तळोजा सेक्टर ३७ मध्ये ८१६, तळोजा सेक्टर ३७ मध्ये ८, तळोजा सेक्टर ३९ मध्ये ७ हजार ५०९ सदनिका विक्रीसाठी उपलब्ध आहे.

पुण्य नगरी
Navi Mumbai Edition
Oct 13, 2024 Page No. 01

सिडकोची २६ हजार घरांची लॉटरी जाहीर

अर्ज भरण्यास सुरुवात

। नवी मुंबई : सिडको महामंडळाच्या वतीने दसऱ्यांचे औचित्य साधून शुक्रवारी सिडको एक्झिबिशनमध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते सिडको महागृहनिर्माण योजनेतील २६ हजार घरांची लॉटरी काढण्यात आली आहे. शनिवारपासून अर्ज भरण्यास देखील उपलब्ध झाले आहे. प्रथम येणाऱ्यास प्राधन्य या धर्तीवर ही लॉटरी काढण्यात आली आहे.

या लॉटरीमध्ये बामणडोंगरी, खारकोपर २ अ, खारकोपर २ ब, खारघर बस डेपो, खारघर बस टर्मिनल, खांदेश्वर रेल्वे स्टेशन, मानसरोवर रेल्वे स्थानक, पनवले बस टर्मिनल, कळंबोली बस डेपो, तळोजा सेक्टर २८, तळोजा सेक्टर २९, तळोजा सेक्टर ३७ या ठिकाणी घरे उपलब्ध आहेत. २६ हजार सदनिका या प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल व अल्प उत्पन्नातील नागरिकांसाठी घरे उपलब्ध करून देण्यात आली आहेत.

इच्छुक अर्जदारांना एक महिन्यांमध्ये नोंदणी करावयाची आहे. तर घरांच्या किमती या सिडकोकडून अद्याप जाहीर करण्यात आल्या नसून त्यांच्या किमती या अन्य प्रकल्पांच्या तुलनेत कमी असतील, असा दावा सिडकोकडून करण्यात आला आहे. तर आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील घरांचा आकार हा वन बीएच के असून ३२२ चौ. फूट आहे. तर अल्प उत्पन्न गटांतील घरांचा आकार हा ३९८ चौरस फूट इतका आहे. बामण डोंगरी उलवे १७०० सदनिका, खारकोपर २ अ येथे २८८ सदनिका, खारकोपर २ ब २८८, खारघर बस डेपो १७००, खारघर बस टर्मिनल ३४०, खांदेश्वर रेल्वे स्टेशन १२३०, मानसरोवर रेल्वे स्थानक ८४०, पनवेल बस टर्मिनल १७२, कळंबोली बस डेपो १३६०, तळोजा सेक्टर २८ मध्ये २ हजार १८५, तळोजा सेक्टर २९ मध्ये १ हजार २४८, तळोजा सेक्टर २९ मध्ये ४ हजार ४३६, तळोजा सेक्टर २९ मध्ये २ हजार १४२, तळोजा सेक्टर ३७ मध्ये ८१६, तळोजा सेक्टर ३७ मध्ये ८, तळोजा सेक्टर ३९ मध्ये ७ हजार ५०९ सदनिका विक्रीसाठी उपलब्ध आहे.

पुढारी महामुंबई मुंबई, रविवार, १३ ऑक्टोबर २०२४

सिडकोची २६ हजार घरांची लॉटरी जाहीर

विजयादशमीपासून अर्ज भरण्यास सुरुवात

नवी मुंबई : पुढारी वृत्तसेवा

सिडको महामंडळाच्या वतीने दसऱ्याचे औचित्य साधून शुक्रवारी ११ रोजी सिडको एक्झिबिशनमध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते सिडको महागृहनिर्माण योजनेतील २६ हजार घरांची लॉटरी काढण्यात आली आहे.

शनिवार १२ पासून अर्ज भरण्यास देखील उपलब्ध झाले आहेत. प्रथम येणाऱ्यांस प्रथम प्राधान्य या धर्तीवर ही लॉटरी काढण्यात आली आहे. या लॉटरीमध्ये बामणडोंगरी, खारकोपर २ अ, खारकोपर २ ब, खारघर बस डेपो, खारघर बस टर्मिनल, खांदेश्वर रेल्वे स्टेशन, मानसरोवर रेल्वे स्थानक, पनवेल बस टर्मिनल, कळंबोली बस डेपो, तळोजा सेक्टर २८, तळोजा सेक्टर २९, तळोजा सेक्टर ३७ या ठिकाणी घरे उपलब्ध आहे. २६ हजार सदनिका या प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल व अल्प उत्पन्नांतील नागरिकांसाठी उपलब्ध करून देण्यात आल्या आहे.

इच्छुक अर्जदारांना एक महिन्यांमध्ये नोंदणी करावयाची आहे. तर घरांच्या किंमती सिडकोकडून अद्याप जाहीर करण्यात आल्या नसून त्यांच्या किंमती या अन्य प्रकल्पांच्या तुलनेत कमी असतील असा दावा

सिडकोकडून करण्यात आला आहे. तर आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील घराचा आकार हा वन बीएचके असून ३२२ चौ फुट आहे. तर अल्प उत्पन्न गटांतील घरांचा आकार हा ३९८ चौरस फुट इतका आहे.

बामण डोंगरी उलवे १७०० सदनिका, खारकोपर २ अ येथे २८८ सदनिका, खारकोपर २ ब २८८, खारघर बस डेपो १७००, खारघर बस टर्मिनल ३४०, खांदेश्वर रेल्वे स्टेशन १२३०, मानसरोवर रेल्वे स्थानक ८४०, पनवेल बस टर्मिनल १७२, कळंबोली बस डेपो १३६०, तळोजा सेक्टर २८ मध्ये २ हजार १८५, तळोजा सेक्अर २९ मध्ये १ हजार २४८, तळोजा सेक्टर २९ मध्ये ४ हजार ४३६, तळोजा सेक्टर २९ मध्ये २ हजार १४२, तळोजा सेक्टर ३७ मध्ये ८१६, तळोजा सेक्टर ३७ मध्ये ८, तळोजा सेक्अर ३९ मध्ये ७ हजार ५०९ सदनिका विक्रीसाठी उपलब्ध आहेत.

लोकमत
Hello Navi Mumbai
Page No. 1 Oct 11, 2024

नवी मुंबई विमानतळावर सुखोईची चाचणी

लोकमत न्यूज नेटवर्क

नवी मुंबई : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर आज दोन विमानांची चाचणी होणार आहे. त्यापैकी सुखोई हे लढावू विमान धावपट्टीपासून काही अंतरावर उडणार आहे. तर दुसरे सी २९५ या विमानाचे प्रत्यक्ष धावपट्टीवर लॅण्डिंग केले जाणार आहे. या कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, सिडकोचे अध्यक्ष संजय शिरसाट तसेच व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल आणि विमानतळ प्राधिकरणाचे संबंधित अधिकारी उपस्थित राहणार आहेत.

प्रकल्पांचे लोकार्पण

दसऱ्याच्या पूर्वसंध्येला होणाऱ्या या कार्यक्रमाच्या अनुषंगाने सिडकोच्या विविध महत्त्वाकांक्षी प्रकल्पांचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते लोकार्पण केले जाणार आहे.

शुक्रवार, ११ ऑक्टोबर २०२४। मुंबई पुण्य नगरी

नवी मुंबई विमानतळावरून आज सुखोईची झेप

। नवी मुंबई : नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या उभारणीचे काम सध्या प्रगतिपथावर आहे. या विमानतळाच्या काही धावपट्टीचे काम पूर्ण झाले असून २०२५ मध्ये पहिले (नागरी वाहतूक) विमान उड्डाण घेणार आहे. या विमानतळाच्या दक्षिणेकडील धावपट्टीवर भारतीय हवाई दलाच्या विमानाच्या धावपट्टीचे उद्घाटन पहिल्या टप्प्यात शुक्रवारी सकाळी ११ वाजता करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमाला नागरी विमान वाहतूक मंत्री किंजरापू राम मोहन नायडू, नागरी विमान वाहतूक व सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार आदी उपस्थित राहणार आहेत.

सिडको मंडळाचे व्यवस्थापकीय संचालक व उपाध्यक्ष विजय सिंघल यांनी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे काम सध्या युद्धपातळीवर सुरू आहे. उरण व पनवेलच्या सीमावर्ती भागात तब्बल १,१६० एकरमध्ये पसरलेल्या नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी अपेक्षित खर्च जवळपास १६,७०० कोटी रुपये इतका आहे. या विमानतळावर दोन रनवे तयार करण्यात आले आहेत, ज्यांची लांबी १.५५ किलोमीटर इतकी आहे. ३१ मार्च २०२५ पर्यंत विमानतळाचे काम पूर्ण होऊन विमानाच्या उड्डाणाचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवण्यात आले आहे. त्यानुसार विमानतळ प्राधिकरणाने आवश्यक त्या चाचण्या सुरू केल्या आहेत. सिग्नल यंत्रणा आणि इन्स्ट्रुमेंट लँडिंग सिस्टिमची चाचणी तीन महिन्यांपूर्वी यशस्वीपणे पार पडली.

दरम्यान, राज्यात होणाऱ्या आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आचारसंहिता लागण्यापूर्वी सत्ताधारी पक्षाच्या नेत्यांनी विविध विकास प्रकल्पांचे भूमिपूजन व लोकार्पण कार्यक्रमांचा सपाटा सुरू केला. त्यानुसार नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर वायू दलाच्या विमानांची उड्डाण चाचणी घेतली जाणार आहे. धावपट्टीवरील चाचणीमध्ये हवाई दलाचे सुखोई हे विमान धावपट्टीपासून काही अंतरावर उडणार आहे तसेच अन्य दुसरे विमान प्रत्यक्ष विमानतळाच्या धावपट्टीवर उतरवले जाणार आहे.

पुढारी महामुंबई मुंबई, शुक्रवार, ११ ऑक्टोबर २०२४

नवी मुंबई विमानतळावर उतरणार आज सुखोई

नवी मुंबई: पुढारी वृतसेवा

नवी मुंबईतील आंतरराष्ट्रीय विमानतळावर शुक्रवारी भारतीय हवाई दलाचे लढाऊ विमान सुखोई उतरणार असून, या महत्त्वाच्या चाचणीप्रसंगी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार, सिडकोचे अध्यक्ष संजय शिरसाट, सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल उपस्थित असतील.

दुपारी ३-४ या वेळेत ही चाचणी होईल. सूखोई विमान धावपट्टीपासून काही अंतरावर उडणार असून, अन्य विमान प्रत्यक्ष धावपट्टीवर उतरवले जाणार आहे.

येत्या डिसेंबरअखेर विमानाचे पहिले उड्डाण या विमानतळावरून होणार असल्याचे या चाचणीवरून म्हटले जात आहे. यावेळी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला स्वर्गीय दि. बा. पाटील यांचे नाव देण्याची घोषणा मुख्यमंत्री करण्याची दाट शक्यता आहे.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ हे प्रस्तावित केलेल्या विमानतळापैकी सर्वात मोठे ग्रीनफिल्ड विमानतळ आहे. ११६० हेक्टर क्षेत्रामध्ये पसरलेल्या या विमानतळामध्ये दोन स्वतंत्र आणि समांतर धावपट्ट्या असतील. यापूर्वी १२ आणि १३ ऑगस्टला या विमानतळावर छोट्या विमानाच्या चाचण्या झाल्या. सिग्नल यंत्रणा आणि इन्स्ट्रुमेंट लँडींग सिस्टमची चाचणी तीन महिन्यांपूर्वी यशस्वी झाली आहे.

आपलं महानगर शुक्रवार ११ ऑक्टोबर २०२४

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरुन आज सुखोईची आकाशी झेप

प्रतिनिधी । आपलं महानगर वृत्तसेवा

पनवेल। नवी मुंबई, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या उभारणीचे काम सध्या प्रगती पथावर आहे. या विमानतळाच्या काही धाव पट्टीचे काम पुर्ण झाले असून २०२५ मध्ये पहिले (नागरी वाहतुक) विमान उड्डाण घेणार आहे. या विमानतळाच्या दक्षिणेकडील धावपट्टीवर भारतीय हवाई दलाच्या विमानाच्या धावपट्टीचे उद्घाटन पहिल्या टप्प्यात शुक्रवार ११ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाला नागरी विमान वाहतूक मंत्री किंजरापू राम मोहन नायडू, नागरी विमान वाहतूक व सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

सिडको मंडळाचे व्यवस्थापकीय संचालक तथा उपाध्यक्ष विजय सिंघल यांनी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे काम सध्या युद्ध पातळीवर सुरू आहे. उरण व पनवेलच्या सीमावर्ती भागात तब्बल १,१६० एकरमध्ये पसरलेले हे नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी अपेक्षित खर्च जवळपास १६,७०० कोटी रुपये इतका आहे. या विमानतळावर दोन रनवे तयार करण्यात आले आहेत. ज्यांची लांबी १.५५ किलोमीटर इतकी आहे. ३१ मार्च २०२५ पर्यंत विमानतळाचे काम पुर्ण होऊन विमानच्या उड्डाणाचे उद्दिष्ट डोळयासमोर ठेवण्यात आले आहे. त्यानुसार विमानतळ प्राधिकरणाने आवश्यक त्या चाचण्या सुरू केल्या असून सिग्नल यंत्रणा आणि इन्स्ट्रुमेंट लँडींग सिस्टमची चाचणी तीन महिन्यापुर्वी यशस्वीपणे पार पडली आहे.

दरम्यान राज्यात होणाऱ्या आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आचारसंहिता लागण्यापुर्वी सत्ताधारी पक्षाच्या नेत्यांनी विविध विकास प्रकल्पांचे भुमीपूजन व लोकार्पण कार्यक्रमांचा सपाटा सुरु केला. त्यानुसार नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर वायू दलाच्या विमानाची उड्डाण चाचणी घेतली जाणार आहे. धावपट्टीवरील चाचणीमध्ये हवाई दलाचे सूखोई हे विमान धावपट्टीपासून काही अंतरावर उडणार आहे. तसेच अन्य दुसऱ्या विमानाचे प्रत्यक्ष विमानतळाच्या धावपट्टीवर विमान उतरले जाणार आहे, अशी माहिती सूत्रांनी दिली आहे.

महाराष्ट्र टाइम्स मुंबई । शुक्रवार, ११ ऑक्टोबर २०२४

गृहस्वप्नाची पूर्ती

इर्शाळवाडी आपत्तीग्रस्तांना आज मिळणार घरांच्या किल्ल्या

म. टा. वृत्तसेवा, नवी मुंबई

खालापूर तालुक्यातील इर्शाळवाडी दुर्घटनेतील ४४ आपत्तीग्रस्तांची घरांची प्रतीक्षा अखेर संपुष्टात आली आहे. आज, शुक्रवारी ११ ऑक्टोबरला वाशी येथे महाराष्ट्र भवनाच्या भूमिपूजन समारंभाप्रसंगी आयोजित कार्यक्रमात मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते या आपत्तीग्रस्तांना सिडकोद्वारा उभारण्यात आलेल्या ४४ घरांचे वाटप केले जाणार आहे.

१९ जुलै २०२३ रोजी घडलेल्या इर्शाळवाडी दुर्घटनेनंतर ४४ आपत्तीग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी सिडकोद्वारे उभारण्यात येणाऱ्या ४४ घरांचे बांधकाम पूर्ण झाले आहे. प्रारंभी ही घरे जिल्हाधिकारी रायगड यांच्याकडे सुपूर्द केली जाणार होती. मात्र, आता सिडकोद्वाराच वाशी येथील कार्यक्रमात इर्शाळवाडीतील पाच आपत्तीग्रस्तांना प्रातिनिधिक स्वरूपात मुख्यमंत्र्यांच्या हस्ते घरांच्या किल्ल्या दिल्या जाणार आहेत.

इर्शाळवाडीतील आपत्तीग्रस्तांचे पुनर्वसन करण्यासाठी रायगडच्या जिल्हाधिकाऱ्यांनी २.६ हेक्टर जागा देऊ केली. त्या जागेवर राज्य रस्ते विकास महामंडळाचे मुख्य नियोजनकार जितेंद्र भोपळे यांच्या मार्गदर्शनाखाली नियोजनकारांच्या पथकाने व जीआयएस या अद्ययावत सॉफ्टवेअर प्रणालीमधल्या तज्ज्ञांनी युद्धपातळीवर काम करून अवघ्या आठ दिवसांत पुनर्वसनाचा आराखडा तयार करून सिडकोला दिला. त्यानंतर सिडकोने ११ महिन्यांच्या आत ४४ घरांची उभारणी केली.

सिडकोने उचलला ३३ कोटींचा भार

इर्शाळवाडीतील आपत्तीग्रस्तांसाठी घरे उभारणीचे काम सिडकोने नोव्हेंबर २०२३ मध्ये हाती घेतले होते. इथल्या नागरिकांसाठी अंगणवाडी, समाजमंदिर, उद्यान, प्राथमिक आरोग्य केंद्र, प्राथमिक शाळा, खेळाचे मैदान आदी सुविधांची निर्मिती सिडकोद्वारे करण्यात आली आहे. तसेच इथल्या नागरिकांना पाणी, वीज, रस्ते आदी सुविधाही सिडको उपलब्ध करून देणार आहे. इर्शाळवाडीतील आपत्तीग्रस्तांना ४४ घरे व सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सिडकोने एकूण ३३ कोटी रुपये (जीएसटीसह) पदरचे खर्च केले आहेत.

सिडकोने केली वचनपूर्ती

इर्शाळवाडीतील आपत्तीग्रस्तांचे पुर्नवसन करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेल्या जमिनीच्या सपाटीकरणासाठी मातीचा भराव टाकणे, जमिनीच्या सर्व बाजूस ८-९ मीटरची संरक्षण भिंत उभारणे, एका बाजूस असलेला दगडी डोंगर फोडणे, दोन छोट्या पुलांची निर्मिती आदी बाबी निर्धारित वेळेत पूर्ण करण्याचे आव्हान सिडकोसमोर होते. त्याचबरोबर रस्ते व अन्य सोयी सुविधा देखील सिडकोस निर्माण करावयाच्या होत्या. या सर्व अडचणींवर मात करत सिडकोच्या अभियांत्रिकी विभागाने व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांच्या मार्गदर्शनाखाली इर्शाळवाडीचे शिवधनुष्य यशस्वीरित्या पेलत पुनर्वसनाचे एक आदर्श उदाहरण राज्यातील इतर शासकीय संस्थांना घालून दिल्याचे बोलले जाते.

मुंबई, शुक्रवार, १२ ऑक्टोबर २०२४ WWW.LOKSATTA.COM
लोकसत्ता

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या धावपट्टीवर शुक्रवारी हवाई दलाने सी- २९५ हे विमान यशस्वीरीत्या उतरविले असून यामुळे या धावपट्टीची पहिली चाचणी यशस्वी झाली आहे. या विमानतळावरून मार्च २०२५ मध्ये वाहतूक सुरू होणार असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्पष्ट केले. काही महिन्यांपूर्वी विमानतळावरील सिग्नल यंत्रणेची चाचणी करण्यात आली होती. – सविस्तर पान ५

महाराष्ट्र टाइम्स । मुंबई । शनिवार, १२ ऑक्टोबर २०२४

सीमोल्लंघनास सज्ज

हवाई दलाच्या 'सी-२९५' विमानाद्वारे धावपट्टीची चाचणी

नवी मुंबई विमानतळावरून मार्चपासून विमानोड्डाण

म. टा. वृत्तसेवा, नवी मुंबई

'नवी मुंबई विमानतळाच्या धावपट्टीची शुक्रवारी यशस्वी चाचणी घेण्यात आली. या विमानतळाचे ८० टक्के काम झाले असून, मार्च २०२५पासून विमानतळावरून विमानोड्डाणास सुरुवात होईल,' असा विश्वास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शुक्रवारी व्यक्त केला.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या धावपट्टीवर शुक्रवारी भारतीय हवाई दलाचे सी-२९५ विमान यशस्वीरित्या उतरवून धावपट्टीची चाचणी घेण्यात आली. यावेळी मुख्यमंत्री बोलत होते. 'आमचे डबल इंजिन सरकार असल्याने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्राच्या सरकारने नवी मुंबई विमानतळ प्रकल्प दृष्टिपथात आणला आहे, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

नवी मुंबईकरांनी यावेळी 'सुखोई-३०'चा थरार अनुभवला. 'सिडकोतर्फे साकारण्यात येत असलेले हे विमानतळ जगातील सर्वांत मोठ्या ग्रीनफिल्ड विमानतळांपैकी (पान १९वर)

के. के. चौधरी

वैशिष्ट्ये काय?

- विमानतळाचे एकूण क्षेत्रफळ ११६० हेक्टर
- दरवर्षी प्रवासी वाहतूक क्षमता ६० दशलक्ष
- दरवर्षी विमानांचे परिचालन ४,७९,०००
- वार्षिक मालवाहू क्षमता १.५ दशलक्ष टन

नव शक्ति
मुंबई, शनिवार, १२ ऑक्टोबर २०२४ marathi.freepressjournal.in

नवी मुंबई विमानतळावर लढाऊ विमानाचे यशस्वी लँडिंग

नवी मुंबई : नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या धावपट्टीची यशस्वी चाचणी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत शुक्रवारी पार पडली. हवाई दलाचे 'सी-२९५' हे लढाऊ विमान धावपट्टीवर यशस्वीपणे उतरविण्यात आले. या विमानांना वॉटर कॅननद्वारे सलामी देण्यात आली. याबरोबरच लढाऊ 'सुखोई ३०' विमानानेही यशस्वी फ्लायपास्ट केले.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे काम आता जवळपास अंतिम टप्प्यात आहे. त्यासाठी विमानतळाच्या धावपट्टीची चाचणी करण्यात आली. या चाचणीनंतर 'सुखोई ३०' या लढाऊ विमानाने फ्लायपास्ट केला. या विमानतळावर () **समिश्र पानावर**

महत्त्वाचा टप्पा पूर्ण - मुख्यमंत्री शिंदे

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, आजचा दिवस इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिला जाईल. विमानतळाच्या दृष्टीने हा महत्त्वाचा टप्पा पूर्ण झाला आहे. विजयादशमीच्या एक दिवस आधी झालेल्या या कार्यक्रममुळे सर्वसामान्य नागरिक आणि प्रवाशांसाठी हा मोठा आनंदाचा क्षण आहे. मार्च २०२५ मध्ये हे विमानतळ नियमित प्रवासी सेवेसाठी सुरू होईल. वेळेआधीच काम पूर्ण करण्याचा प्रयत्न असल्याचेही त्यांनी सांगितले. सिडकोने केलेल्या उत्कृष्ट कामाबद्दल सर्व टीमचे शिंदे यांनी अभिनंदन केले. हे विमानतळ सर्वसामान्यांसाठी मोठे सोयीचे ठरेल. यामुळे महाराष्ट्राच्या प्रगतीला आणखी वेग येईल, असे ते म्हणाले. या विमानतळामुळे हजारो रोजगाराच्या संधी निर्माण होतील. आयटी पार्क आणि व्यावसायिक केंद्रे उभारली जातील, असा विश्वास शिंदे यांनी व्यक्त केला.

प्रवाशांसाठी फायदेशीर प्रकल्प - फडणवीस

नवी मुंबई विमानतळावरून दरवर्षी अंदाजे ९ कोटी प्रवासी प्रवास करतील, असा विश्वास उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ हे शिवडी-न्हावाशेवा सी-लिंक, मुंबई तसेच नवी मुंबई मेट्रो व दोन खाडीमार्गांने जोडला जात असून तो देशातील एक विशेष प्रकल्प ठरणार आहे.

नवी मुंबई विमानतळावर लढाऊ विमानाचे यशस्वी लँडिंग

लँडिंग करणाऱ्या 'सी-२९५' या विमानाच्या वैमानिकाचा मुख्यमंत्री शिंदे आणि उपमुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी केंद्रीय नागरी उड्डाण राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, सिडकोचे अध्यक्ष संजय शिरसाट, खासदार श्रीरंग बारणे, सुनील तटकरे, डॉ. श्रीकांत शिंदे, नरेश म्हस्के, आमदार गणेश नाईक, आमदार प्रशांत ठाकूर, महेश बालदी, अपर मुख्य सचिव इक्बालसिंह चहल (गृह), सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल, नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे, विभागीय आयुक्त डॉ. देशमुख, रायगड जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

पुण्य नगरी मुंबई विभाग । शनिवार, १२ ऑक्टोबर २०२४ । मुंबई

नवी मुंबई विमानतळावर उतरले वायुदलाचे विमान

मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत यशस्वी लॅण्डिंग चाचणी

उरण : नवी मुंबईचा आसमंत भारतीय वायुदलाच्या लढाऊ विमानांच्या आवाजाने व भरारीने शुक्रवारी दुमदुमून गेला. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर भारतीय वायुदलाच्या लढाऊ विमानाची यशस्वी चाचणी घेण्यात आली. सी-२९५ या लढाऊ विमानाच्या लॅण्डिंगनंतर सुखोई ३० चे फ्लायपास हे दोन ऐतिहासिक क्षण नागरिकांना सुखद धक्का देणारे ठरले. या वेळी लढाऊ विमानावर पाण्याचा फवारा करत अनोखी सलामी देण्यात आली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत ही चाचणी पार पडली.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे काम आता जवळपास अंतिम टप्प्यात आले आहे. त्यासाठी विमानतळाच्या धावपट्टीची शुक्रवारी लॅण्डिंग चाचणी घेण्यात आली. भारतीय वायुदलाचे सी २९५ या लढाऊ विमानाचे यशस्वी लॅण्डिंग झाल्यानंतर वैमानिकाचा मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. त्यानंतर सुखोई ३० या लढाऊ विमानानेही फ्लायपास केले. सी २९५ विमान हे गांधीनगरहून तर सुखोई हे पुण्यातून आले होते. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विमानात बसून फोटोसेशन केले. तसेच विमानाच्या कॉकपीट मध्ये बसून बाहेर हात उंचावला.

या वेळी हवाई उड्डाणमंत्री किंजरापू राममोहन नायडू, केंद्रीय नागरी उड्डाण राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, सिडकोचे अध्यक्ष संजय शिरसाट, खा.श्रीरंग बारणे, खा.सुनील तटकरे, खा.श्रीकांत शिंदे, खा.नरेश म्हस्के, आ.मंदा म्हात्रे, आ.गणेश नाईक, आ.प्रशांत ठाकूर, आ.महेश बालदी, अपर मुख्य सचिव गृह इक्बाल चहल, सिडकोचे उपाध्यक्ष विजय सिंघल, नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे, रायगड जिल्हाधिकारी किशन जावळे उपस्थित होते.

मार्च २०२५ मध्ये देशांतर्गत सेवा सुरू होणार

या वेळी मुख्यमंत्र्यांनी आजचा दिवस इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिला जाईल, असे नमूद करून या यशस्वी चाचणीचे महत्व अधोरेखित केले. विमानतळाच्या दृष्टीने महत्वाचा टप्पा पूर्ण झाला आहे. मार्च २०२५ मध्ये हे विमानतळ देशांतर्गत प्रवासी सेवेसाठी सुरू होईल. वेळेआधीच काम पूर्ण करण्याचा प्रयत्न असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. हे विमानतळ सर्वसामान्यांसाठी मोठे आश्रयस्थान बनेल तसेच यामुळे महाराष्ट्राच्या प्रगतीला आणखी वेग येईल, असेही मुख्यमंत्र्यांनी या वेळी सांगितले. या विमानतळामुळे हजारो रोजगारांच्या संधी निर्माण होतील, तसेच इथे आयटी पार्क व व्यावसायिक केंद्रे उभारली जातील, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी या वेळी व्यक्त केला.

प्रवाशांसाठी फायदेशीर प्रकल्प - देवेंद्र फडणवीस

नवी मुंबई विमानतळाचा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर या विमानतळावरून दरवर्षी अंदाजे ९ कोटी प्रवासी प्रवास करतील, असा विश्वास उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ हे शिवडी-न्हावाशेवा सी-लिंक, मुंबई तसेच नवी मुंबई मेट्रो, दोन खाडी मार्गांने जोडल्यामुळे तो देशातील एक विशेष प्रकल्प ठरणार असल्याचे ते म्हणाले.

मुंबई, शनिवार, १२ ऑक्टोबर २०२४ तरुण भारत

नवी मुंबई विमानतळ धावपट्टीची यशस्वी चाचणी

मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत वायुदलाच्या विमानाचे लॅण्डिंग

नवी मुंबई, दि.११ : विशेष प्रतिनिधी

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या धावपट्टीची भारतीय वायुदलाच्या विमानांसह यशस्वी चाचणी घेण्यात आली. राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत हा सोहळा संपन्न झाला. भारतीय वायुदलाचे 'C-२९५' हे विमान धावपट्टीवर यशस्वीपणे उतरविण्यात आले. यावेळी, या विमानावर पाण्याचे उंचच उंच फवारे मारत 'वॉटर सॅल्यूट' देण्यात आले. याबरोबरच लढाऊ विमान 'सुखोई ३०'नेही या विमानतळाच्या यशात फ्लायिंग पास करून अनोखी सलामी दिली. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय (पान १० वर)»

• 'सुखोई' विमानाच्या नवी मुंबई विमानतळावर घिरट्या

हे विमानतळ आधुनिक भारताची झलक : देवेंद्र फडणवीस

''आजचा दिवस अत्यंत महत्त्वाचा आहे. ज्या नवी मुंबई विमानतळाचे काम आपण सुरु केले होते, त्या विमानतळावर पाहिले लॅण्डिंग झाले आहे. आणि हे लॅण्डिंग यशस्वी झाले आहे. ज्यावेळी आम्ही या विमानतळाचे काम सुरु केले, तेव्हा विरोधकांनी टीका केली. हे विमानतळ होणार नाही, असे म्हणाले होते. मात्र, आज चाचणी लॅण्डिंग झाले आहे. (पान १० वर)»

पान ३ वरुन...

नवी मुंबई विमानतळ धावपट्टीची यशस्वी चाचणी

विमानतळाच्या पहिल्या टप्प्याचे काम प्रगतिपथावर आहे. नवी मुंबई विमानतळाचे काम गेल्या तीन वर्षांपासून सुरु होते. त्यावर एका धावपट्टीचे काम पूर्ण झाले. याचाच एक भाग म्हणून विमानतळाच्या धावपट्टीची शुक्रवार दि. ११ ऑक्टोबर रोजी यशस्वी चाचणी घेण्यात आली. या चाचणीदरम्यान वायुदलाच्या 'सी २९५' विमानाने विमानतळावरून सात ते आठ घिरट्या अवकाशात घातल्या. त्यानंतर हे विमान धावपट्टीवर उतरले. विमान धावपट्टीवर उतरताच त्याला 'वॉटर सॅल्यूट' देण्यात आले. या चाचणीनंतर 'सुखोई ३०' या लढाऊ विमानानेही फ्लाय पास केला. लॅण्डिंग करणाऱ्या 'सी २९५' विमानाच्या वैमानिक कॅप्टनचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

यावेळी केंद्रीय नागरी उड्डाण राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, सिडको महामंडळाचे अध्यक्ष, संजय शिरसाट, खा. श्रीरंग बारणे, खा. सुनील तटकरे, खा. डॉ. श्रीकांत शिंदे, खा. नरेश म्हस्के, आ. गणेश नाईक, आ. प्रशांत ठाकूर, आ. महेश बालदी, अपर मुख्य सचिव गृह इकबालसिंग चहल, सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, विजय सिंघल, नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे, विभागीय आयुक्त डॉ. देशमुख, रायगड जिल्हाधिकारी किशन जावळे यांसह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. 'उ २९५' विमान हे गांधीनगरहून, तर 'सुखोई' हे विमान पुण्यातून आले होते.

महाराष्ट्राच्या प्रगतीला आणखी वेग : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

यावेळी माध्यमांशी बोलताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ''आजचा दिवस इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिला जाईल,'' असे नमूद करून या यशस्वी चाचणीचे महत्त्व अधोरेखित केले. विमानतळाच्या दृष्टीने महत्त्वाचा टप्पा पूर्ण झाला आहे. विजयादशमीच्या एक दिवस आधी झालेल्या या कार्यक्रमामुळे सर्वसामान्य नागरिक आणि प्रवाशांसाठी मोठा आनंद आहे. मार्च २०२५ मध्ये हे विमानतळ नियमित प्रवासीसेवेसाठी सुरू होईल. वेळेआधीच काम पूर्ण करण्याचा प्रयत्न राहील,'' असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले. तसेच, सिडकोने केलेल्या उत्कृष्ट कामाबद्दल सर्व टीमचे अभिनंदन केले. ''हे विमानतळ सर्वसामान्यांसाठी मोठे आश्रयस्थान बनेल. तसेच, यामुळे महाराष्ट्राच्या प्रगतीला आणखी वेग येईल. या विमानतळामुळे हजारो रोजगाराच्या संधी निर्माण होतील. तसेच, इथे आयटी पार्क आणि व्यावसायिक केंद्रे उभारली जातील,'' असा विश्वास शिंदे यांनी यावेळी व्यक्त केला.

नवराष्ट्र | मुंबई, १२ ऑक्टोबर २०२४

धावपट्टीवर विमान उतरताच 'वॉटर सॅल्यूट'

'सुखोई'चे नवी मुंबईत लँडिंग !

नवी मुंबई, (वा.) नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर विमानाची चाचणी यशस्वी झाली आहे. भारतीय हवाईदलाचे सुखोई 'सी २९५' विमान विमानतळावर लँण्डींग झाले. विमानाने आकाशात सात ते आठ घिरट्या घालल्या. त्यानंतर नवी मुंबई विमानतळाच्या धावपट्टीवर विमानाची यशस्वी लॅण्डींग झाले. राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, सिडकोचे अध्यक्ष आमदार संजय शिरसाट, मुरलीधर मोहोळ आणि इतर मंत्र्यांच्या उपस्थिती ही चाचणी घेण्यात आली. 'सी २९५' विमानानंतर सुखोई ३० विमानसुद्धा धावपट्टीवर उतरले. हे विमान धावपट्टीवर उतरताच त्याला 'वॉटर सॅल्यूट' करण्यात आले. धावपट्टीच्या बाजूने पाण्याचे फवारे उडवून या विमानाला मानवंदना देखील देण्यात आली. २०२५ पर्यंत या विमानतळावरून देशांतर्गत विमान वाहतूक सुरू होईल, असे सरकारकडून सांगण्यात आले आहे.

> नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ हे शिवडी न्हावाशेवा सी लिंक, मुंबई तसेच नवी मुंबई मेट्रो, दोन खाडी मार्गाने जोडल्ल जात असून तो देशातील एक विशेष प्रकल्प ठरणार आहे. या विमानतळावरून ९ कोटी प्रवासी दर वर्षी प्रवास करतील, असा विश्वास आहे.
> - **देवेंद्र फडणवीस**, उपमुख्यमंत्री

मार्चपर्यंत खुले होणार

यशस्वी लॅंडींग हा या पूर्ण बांधणीतला महत्वाचा टप्पा होता. ५ टप्प्यात नवी मुंबई विमानतळ उभारले जाणार आहे. यात एक टर्मिनल आणि एक रनवे असेल. ३१ मार्च २०२५ पर्यंत हे विमानतळ वाहतुकीसाठी खुले होणार आहे.

'या' गोष्टी महत्त्वाच्या

विमानतळावरील धावपट्टीची तपासणी करण्यासाठी लॅंडिंग सर्वाधिक महत्त्वाचे असते. विमान वेगात उतरणे, धावपट्टीने टायर्स पकडून ठेवणे, रेझिस्टन्स आदी गोष्टी याद्वारे तपासल्या जातात. धावपट्टीची तपासणी करण्यासाठी उतरवलेल्या विमानात इतर चाचण्या करणाऱ्या यंत्रणा असतात. त्या अनुषंगाने शुक्रवारी देखील नवी मुंबई विमानतळावर चाचणी करण्यात आली.

धावपट्टीची पहिली चाचणी झाली यशस्वी

विमानतळाचे काम प्रगतीपथावर आहे. सिडको मंडळाला तीन महत्वाचे प्रकल्प आचारसंहितेपूर्वी मार्गी लावायचे होते. या तीन प्रकल्पांमध्ये २६ हजार महागृहनिर्माण प्रकल्पाची सोडत, खालापूर येथील इर्शाळवाडी येथे आदिवासी बांधवांना घरांचे वाटप आणि सर्वात महत्वाचा प्रकल्प म्हणजे नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर दोन विमानांच्या चाचण्यांचा समावेश आहे. धावपट्टीची पहिली चाचणी यशस्वी झाली.

जाहीर सूचना

[illegible]

आपलं महानगर शनिवार १२ ऑक्टोबर २०२४

नवी मुंबई विमानतळावरून सुखोईची भरारी !

हवाई दलाच्या सी-२९५ विमानाचे यशस्वी लॅण्डिंग-टेक ऑफ

प्रतिनिधी । आपलं महानगर वृत्तसेवा

+नवी मुंबई। बहुचर्चित नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर शुक्रवारी इतिहास घडला. भारतीय हवाई दलाच्या सुखोई ३० एमकेआय विमानाने दुपारी १२.१५ वाजता विमानतळावरून दोनदा भरारी घेत (फ्लाय पास्ट) धावपट्टीचा आढावा घेतला. यानंतर ७ ते ८ मिनिटांच्या घालल्यानंतर हवाई दलाच्या सी-२९५ विमानाने नवी मुंबई विमानतळाच्या धावपट्टीवर यशस्वी लॅण्डिंग केले. यावेळी नवी मुंबईच्या आसमंत सुखोईच्या आवाजाने दुमदुमून गेला होता. पान २

(पान ५ वरुन)

नवी मुंबई विमानतळावरून सुखोईची भरारी !

सध्या नवी मुंबई विमानतळावर धावपट्टी, तांत्रिक आणि सिग्नल चाचणी सुरू आहे. त्याअंतर्गत पहिल्यांदाच नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर विमान उतरल्याने ही चाचणी यशस्वी झाल्याचे सांगण्यात आले. यानंतर विमानाला वॉटर सॅल्यूट करण्यात आले. नवी मुंबईकरांनीही दुरूनच हा ऐतिहासिक क्षण डोळ्यांत साठवला. या विमानतळावर २ रनवे आणि ४ टर्मिनल असणार आहेत.

२०२५ मध्ये नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून विमानसेवा सुरू करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, हवाई उड्डाणमंत्री किंजरापू राममोहन नायडू, राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, मावळचे खासदार श्रीरंग बारणे, आमदार गणेश नाईक, आमदार मंदा म्हात्रे, सिडकोचे अध्यक्ष संजय शिरसाट यांच्यासह नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि हवाई दलाचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

जनतेच्या दरबारात होऊन जाऊ दे-एकनाथ शिंदे

